## ई-वेबिणार

## ”कोरोनामुळे विध्यार्थावरील मानसिक ताण व उपाय” (२५ जुलै २०२०)

लोणार येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात दि.२५ जुलै रोजी एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन "कोरोनामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण व उपाय "या विषयावर कै.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय व जीवनविद्या मिशन ,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदरणीय प्रल्हाद वामनराव पै यांना मार्गदर्शन केले.तर प्रमुख उद्घाटक म्हणुन मा. डॉ.दिनेश सातंगे संचालक विद्यार्थी विकास विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे होते.कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू सर यांनी आपल्या प्रास्ताविकात या राष्ट्रीय वेबिनारचा उद्देश स्पष्ट केला.यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यी आज कोरोनामुळे शिक्षणापासून,महाविद्यालयापासुन,दुरस्त झाले असुन सततच्या गंभिर परिस्थिती मुळे त्यांचे मानसिक संतुलन खालावत चालले आहे यासाठी आम्ही या वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे असे ते म्हणाले.यानंतर प्रमुख उद्घाटक डॉ.दिनेश सातंगे यांनी विद्यार्थ्यांनी कोनत्याही प्रकारे खचुन न जाता आहे या परिस्थितीला सामोरे जात आपन आपले ज्ञान वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे .सध्या आपल्या विद्यापिठामार्फत विवीध ऑनलाईन कोर्सेस चालु आहे यामध्ये आपण सहभागी होऊन आपल्या ज्ञानामध्ये सर टाकु शकता असे ते म्हणाले.यांनतर आदरणीय दादा उर्फ प्रल्हाद वामनराव पै यांनी आपल्या प्रमुख मार्गदर्शनात आपण जगाची परिस्थिती बदलू शकत नाही पण या कोरोणामूळे उद्धवलेल्या परिस्थितीचा परिणाम आपल्यावर होऊ न देणे आपल्या हातात आहे. सध्या नैराश्य हा खूप मोठा प्रश्न निर्माण झाला असून मानसिक आरोग्य चांगले ठेवणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी सध्या मिळत असलेल्या वेळेचा सदुपयोग करायला हवा. परीक्षा होतील किंवा नाही याचा विचार न करता ज्ञान मिळवत राहून स्वतःची प्रगती करत राहावे. कोणत्याही क्षेत्रात काम करताना आपला हेतू चांगला व मोठा असावा तसेच देशहिताचा असावा असे त्यांनी सांगितले. आपले विचार नेहमी

चांगले व सकारात्मक असावे व व्यापक विचार करून सर्वांचे भले व्हावे असा असावा आशावाद ठेवावा. आपल्याला मदत व मार्गदर्शन करणाऱ्या विषयी आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

सदर वेबिनार हा झुम या ऑनलाईन ॲपवर व युट्युब लाईव्ह करण्यात आला होता.यामध्ये जवळपास एक हजार लोकांनी नोंदणी करून ३२५ सहभागी यांनी ऑनलाईन बघीतला.सदर वेबिनारचे सुत्रसंचालन या कार्यक्रमाचे समंन्वयक प्रा.शिवशंर मोरे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.सौरभ गायकवाड यांनी केले.यामध्ये डॉ.सुर्यकांत बोरूळ, प्रा.कमलाकर वाव्हळ,यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.तसेच जीवनविद्या मिशनचे सदस्य मा.श्री.अनिल राठी,या.श्री.विष्णु सरोदे,सौ.पुजा पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.





अमृत सेवाभावी संस्था परभणी संचालित

कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय,
लोणार ता.लोणार जि.बुलडाणा ४४३३०२
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
एक दिवशीय राष्ट्रीय वेबिणार
"कोरोणामळे विध्यार्थ्यावरील मानसिक ताण"
शनिवार दि. २५ जुलै २०२०, वेळ :- सकाळी ११.०० वा

वेबिणार कार्यक्रमपत्रिका

| अ.क्रं | कार्यक्रम | प्राध्यापक/मार्गदिर्शकाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| १ | Technical Test | प्रा.सौरभ गायकवाड,प्रा.डॉ.महेंद्र भिसे,प्रा.रामेश्वर देव्हडे. | 10.55-11.00 |
| २ | सूत्रसंचालन | प्रा.शिवशंकर मोरे | 11.00-11.05 |
| ३ | प्रास्ताविक | प्राचार्य,डॉ.प्रकाश बनमेरू | 11.05-11.15 |
| ४ | उद्घाटक परिचय | प्रा.कमलाकर वाव्हळ | 11.15-11.20 |
| ५ | प्रमुख उद्घाटक परिचय | डॉ.दिनेश सातंगे (संचालक,विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) | 11.20-11.25 |
| ६ | प्रमुख मार्गदर्शक परिचय | डॉ.सुर्यकांत बोरूळ | 11.25-11.35 |
| ७ | मागर्दर्शन | मा.प्रल्हाद वामनराव पै.(दादा) (B.Tech.IIT Powai, MBA,Jamanlal Bajaj Mumbai TQM,Japan) युवा मार्गदर्शक, आजीवन विश्वस्त जीवन विद्या मिशन मुंबई. | 11.35-12.55 |
| ८ | आभार प्रदर्शन | प्रा.सौरभ गायकवाड | 12.55-1.00 |




वेबिणार मध्ये प्रास्ताविक मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू सर तर प्रमुख मार्गादर्शन करतांना मा. प्रल्हाद पै दादा व सदर कार्याक्रिमाचे लाईव्ह युटूब प्रक्षेपण .